
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

# Vidyawarta®

January 2018



Special Issue On

## Impact of GST on Indian Economy

Editor
Dr. Ganesh Deshmukh
Dr. Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

UGC Approved
Jr.No.62759

Jan. To March 2018
Special Issue

**Editor**
**Dr. Deshmukh Ganesh**
**Dr. Bapu g. Gholap**

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

44) Goods and Service Tax in India: An Overview
Dr. V. A. Kharde || 149

45) The Impact of GST on the Common Man
Dr. R. A. Dighe || 152

46) A Study of GST and its Impact on Agriculture Sector
Mr. Tambe Yogesh Bapusaheb || 154

47) Advantages and Disadvantages of GST
Mr. Shelke Digambar Sakharm || 157

48) Advantages and Disadvantages of GST
Watane Usha H. || 159

49) वस्तु व सेवा कर (GST) आणि भारतीय अर्थव्यवस्था
प्रा. डॉ. शिवाजी पाते || 161

50) आर्थिक बाबीवरील वस्तू व सेवा कराचा परिणाम
डॉ.सुनिल अण्णा गोरडे || 163

51) जीएसटी :- एक देश एक कर
प्रा. काळे गोविंद रामराव, डॉ. नासिकेत गोविंदराव सुर्यवंशी || 165

52) वस्तु व सेवा कराचा ग्राहकांवर होणारा परिणाम
डॉ. सोळुंके धैर्यशील बाबूराव || 168

53) वस्तू आणि सेवा कराचे काही गुण दोप
प्रा. पुपलवाड ज्ञानेश्वर आनंदराव, || 170

54) वस्तु व सेवाकराचे फायदे आणि तोटे
प्रा. डॉ. रार्जेद्र एल. कबले || 174

55) भारतातील वस्तू व सेवा कराचा आढावा
डॉ. विजय चंद्रभान सुर्वे || 177

56) वस्तू व सेवा कराचा ग्राहकांवर होणारा परिणाम
मोरे माधवी अशोकराव || 179

57) Indian Fiscal Federalism and Goods and Services Tax
Mr. S. A. Mule, Dr.A.T.Tawar || 181


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

56

# वस्तू व सेवा कराचा ग्राहकांवर होणारा परिणाम

**मोरे माधवी अशोकराव**
संशोधक विद्यार्थीनी,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेवगाव

**प्रस्तावना :-**

वस्तू व सेवा कर एक जुलै २०१७ पासून संपूर्ण भारतभर ही कर प्रणालीची अंमलबजावणी सुरु झाली. अप्रत्यक्ष कर प्रणाली आकारणी बाबतचा हा एक अत्यंत महत्वपुर्ण तसेच धाडसी निर्णय आहे. १७ प्रकारचे कर आणि २३ प्रकारचे अधिकार मिळून एकच जी.एस.टी. ही निश्चितपणे स्वातंत्र्यानंतरची सर्वत मोठी कर क्रांती आहे. जी.एस.टी.च्या माध्यमातून मोठ्या आर्थिक परिवर्तनाचा दावा सरकारने केला आहे. देशालाही हा बदल अपेक्षित आहे. ५ महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरी जी.एस.टी.ला पाठिंबा व विरोध एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. उत्पादक, व्यापारी व ग्राहक या सर्वांच्या मनात काही प्रमाणात गोंधळ असल्याचे दिसून येत आहे. ग्राहक हा जी.एस.टी. भरणारा एकुण साखळीतील वस्तू व सेवा घेणारी शेवटची व्यक्ती आहे. जी.एस.टी.ला विरोध करणाऱ्या गटामध्ये ग्राहकाचा आवाज कोठेही दिसून येत नाही. सामान्य जनतेची फसवणूकच होत असल्याचे दिसून येते. आपली फवसणूक टाळण्यासाठी प्रत्येकाने जागरुक असणे गरजेचे आहे. जी.एस.टी. ची प्रक्रिया सुरु झाली तेव्हा जगातील ३४ देशांमध्ये ही कर व्यवस्था लागू होती. आता जी एस टी लागू असलेल्या देशांची संख्या १६१ झाली आहे. भारत १६१ वा देश आहे.

(G.S.T.) जी एस टी म्हणजे वस्तू व सेवा कर असून ो वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर १ जुलै पासून यापुढे लागू राहिल. अनेक विकसीत देशामध्ये जी एस टी पध्दतीची कर प्रणाली अस्तित्वात आहे. त्यामुळे कर आकरणीत सुटसुटीतपणा येणार आहे. कर प्रणाली सुधारण्याच्या दृष्टीकोनातून हे बिल फार महत्वाचे आहे. २००६-०७ च्या अंदाजपत्रकात कॉंग्रेसच्या राजवटी मध्ये प्रथम जी एस टी चा उल्लेख केला होता.

जी एस टी हा अप्रत्यक्ष कराचाच एक प्रकार आहे. वस्तूंचे उत्पादन, विक्री, आयात आणि सेवा या सर्वांवरील राष्ट्रीय पातळीवरील सर्व समावेशक अप्रत्यक्ष कर असेल. केंद्र सरकार आणि राज्य सरकार जे निरनिराळे अप्रत्यक्ष कर लावतात त्या सर्व करांची जागा जी एस टी घेणार आहे. व्हॅट, एक्साईज आणि सर्व्हिस टॅक्स असे तीन कर लावण्या ऐवजी जी एस टी हा एकच कर लावला जाईल.

उद्दिष्ठे - १. जी एस टी चे सामान्य ग्राहकावर झालेले परिणाम अभ्यासणे.

२. जी एस टी आणि सध्याच्या कर प्रणालीतील फरक अभ्यासणे.

**जी एस टी चा सामान्य ग्राहकांवर परिणाम :-**

सर्वात प्रथम असे सांगीतले जाते की जी एस टी लागू झाल्याने सर्वात जास्त फायदा हा सामान्य माणसांचा होणार आहे. अप्रत्यक्ष करांचा भार अंतिम उपभोक्ता यावर पडतो. एकाच वस्तूवर विविध प्रकारचे कर लावले जातात परंतु जी एस टी लागू होण्याने सर्व वस्तूचा एकच लावला जाईल. संपूर्ण देशांत सामान खरेदी करण्यासाठी एकच कर एकाच दराने कर द्यावा लागेल. संपूर्ण देशामध्ये एकाच किंमतीला एक प्रकारचे सामान खरेदी करता येईल. उदा. एखादी वस्तू मुंबईला घ्या, दिल्लीला घ्या अथवा कलकत्त्याला घ्या ती वस्तू एकाच किंमतीला मिळेल. सध्या कुठल्याही वस्तुवर सामान्य माणूस प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे २० वेगवेगळे प्रकारचे कर भरतो.

आता ग्राहकाचा विशेष फायदा असलेले २५ऽ ते ३०ऽ एवढे एकंदरीत कराचे ओझे कमी होईल. घरगुती वापराच्या बहुसंख्य वस्तुंच्या किंमती कमी करण्यासाठी एकच कर आकारण्यात आला आहे. जी एस टी मुळे वेगवेगळे प्रकारचे कर भरण्यापासून सुटका होईल. कर वसुली, कर आकारणी, कर चुकवेगीरी या मध्ये होणारे वादविवाद, गैरव्यवहार बंद होतील. एकाच व्यक्तीला किंवा संस्थेला एकाच वस्तूसाठी अनेक ठिकाणी वेगवेगळे कर द्यावे लागत ते बंद पडेल. एकदा जी एस टी भरला की झाले.

जी एस टी लागू झाल्याने सेन्ट्रल सेल्स टॅक्स (व.च.ट्र.) हा जी एस टी मध्ये समावेश होईल. कर वसुली करते वेळी अधिकारी वर्गाकडून गेरव्यवहार होण्याचे प्रमाण कमी होईल. आपल्या देशामध्ये जी एस टी चे दरे ० %, ५%, १२%, १८%, २८% असून ते वस्तू व सेवेनुसार आकारले जाते.

जी एस टी चे जसे फायदे आहेत तसेच तोटे सुध्दा आहेत. जे संभाव्य तोटे आहेत ते गरीबांना होतील. महागाई होईल याचा त्रास सुध्दा गरीबांनाच होईल. जी एस टी मुळे बेरोजगार

तरुणांना त्रास होत आहे. पूर्वी शिक्षणांशी संबंधीत कोणत्याही गोष्टी मध्ये कर आकारला जात नसे. परंतु आता सरकारी नोकऱ्यासाठीच्या परिक्षा शुल्कावर जी एस टी आकारला जात आहे. परिक्षांचे अर्ज भरताना १२% जी एस टी लावण्यात आला आहे. त्यामुळे ५००/- रु. मिळणा-या नोकरीच्या उमेदवारी अर्जांवर ९०/- रु. कर लावला आहे.

**जी एस टी मुळे या गोष्टी महाग होणार :-**

चहा, कॉफी, डबा बंद उत्पादने, सेवा, मोबाईल, क्रेडीट कार्ड बील, जेम्स आणि ज्वेलरी, रेडीमेंट गारमेंटस इत्यादी गोष्टी महाग होणार आहेत.

**जी एस टी मुळे या गोष्टी स्वस्त होणार :-**

१. देवाण घेवाणीवर व्हॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागणार नाही.

२. घर खरेदी करण्यासाठी किंवा विक्री करण्यासाठी ज्या गोष्टींसाठी व्हॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागतो जी एस टी लागू झाल्यामुळे हा खर्च कमी होणार आहे.

३. हॉटेलींग स्वस्त : रेस्टॉरंटचं बील यामुळे कमी होईल.

ग्राहकाने फसवणूक कशी टाळावी यासाठी खालील उपाय सांगता येतील. :-

१) ग्राहक हा जर एखादी वस्तू व सेवा संबंधित व्यापा-याकडून घेत असेल व व्यापारी जी एस टी ची आकारणी करीत असेल तर त्या व्यापा-याची जी एस टी नोंदणी आवश्यक आहे.

२) व्यापा-याने दिलेल्या बिलावर नोंदणी असलेला जी एस टी आय.एन. नंबर असणे आवश्यक आहे. जी एस टी नोंदणीकृत प्रत्येक व्यावसायीकाला १५ अंकी युनिक आयडेंटिफिकेशन नंबर दिला जातो.

३) ज्या व्यावसायीकाची वार्षिक उलाढाल वीस लाख रुपयांच्या आत आहे अशा व्यावसायिकास जी एस टी नोंदणी करणे बंधनकारक नाही. जर जी एस टी नोंदणीकृत व्यावसायीक नसेल तर तो आपल्या बिलात जी एस टी आकारु शकत नाही.

४) आपल्याला देण्यात येणारे बिल बारकाईने तपासून घ्या. जी एस टी व्यतीरिक्त अन्य कुठलाही कर आकारला नाही याची खात्री करुन घ्या.

५) आपल्या देशामध्ये जी एस टी चे दरे ० %, ५%, १२%, १८%, २८% असून ते वस्तू व सेवेनुसार आकारले जाते. आकारलेला दर हा घेतलेल्या सेवा अथवा वस्तू यानुसार असल्याची खात्री करुन घ्या. हे जाणून घेण्यासाठी जी एस टी पोर्टलवर एक ॲप उपलब्ध आहे.

६) एमआरपी वर जी एस टी आकारता येत नाही. तसे आढळून आल्यास तक्रार नोंदवावी.

७) ज्या व्यावसाईकांनी कंपोझिशन स्कीम अंतर्गत नोंदणी केली आहे असे व्यावसायिक ग्राहकाला विकत असलेल्या वस्तू व सेवेवर जी एस टी कर आकारु शकत नाही.

८) जी एस टी च्या दरांमध्ये वेळोवेळी बदल होत असल्याचे दिसून येते. आपण घेत असलेल्या वस्तू अथवा सेवांचे जी एस टी दर कमी झाले असल्यास त्याचा लाभ आपल्याला मिळणे अपेक्षित आहे. जर लाभ होत नसेल तर संबंधित व्यावसाईकाच्या विरुध्द तक्रार नोंदवावी व सोबत बिलाची प्रत जोडावी.

**निष्कर्ष :-**

वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीस १ जुले २०१७ पासून सुरुवात झाली. सामान्य ग्राहक व्यावयाईकांना झालेला कर बदल आपआपल्या व्यावसानुरुप या कर प्रणालीशी सामावून घेतला. व्यावसायिकांनी जी एस टी नोंदणी करुन घेतली. ग्राहकांना समजेल अशा सोप्या भाषेत जी एस टी बिल ग्राहकांना देण्यात येवू लागले.

जी एस टी ही आता एक वस्तुस्थिती आहे त्यामुळे प्रत्येकाला जी एस टी बाबत आवश्यक ती माहिती असणे आवश्यक आहे. जी एस टी मध्ये वेळोवेळी बदल केले जात आहेत व यापुढेही बदल होणे अपेक्षित आहे. ग्राहकांनी वेळोवेळी होणारे बदल समजून घेतले पाहिजे जेणेकरुन फसगत होणार नाही. जी एस टी मुळे आर्थिक शिथिलता वाढेल आणि यामुळे प्रत्येकाला त्याचा लाभ होईल. रोजगार निर्मीती मोठ्या प्रमाणावर होईल. थोडक्यात सर्व स्तरावर म्हणजे करदाता, शासन, ग्राहक सर्वांनाच आपलेसे करणारी परिस्थिती निर्माण होईल.

**संदर्भ यादी**

१. वस्तू व सेवा कर आढावा ॲप G.S.T.

२. दैनिक सकाळ साप्ताहिक - १६ डिसेंबर २०१७ 'अर्थ विशेष' - सुधाकर कुलकर्णी पान नं.४६

३. दैनिक 'दिव्य मराठी' - १ जुले २०१७ करक्रांती

४. दैनिक सकाळ - २६ जुन २०१७

५. दैनिक लोकसत्ता - २ जानेवारी २०१८

❑❑❑